डॉ. बी. जी. बिराजदार, प्राध्यापक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्या <u>बदलीस स्थगिती देणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांकः न्यायाप्र-२०१९/प्र.क्र. (८१/१९)/ तांशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १९ ऑगस्ट, २०१९

<u>संदर्भ :</u> उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक : बदल्या-२०१८/ प्र.क्र.(१०३/२०१८)/ तांशि-१, दि. ३०.०५.२०१८

<u>शासन आदेश :-</u>

संदर्भाधीन आदेशान्वये डॉ. बी. जी. बिराजदार, प्राध्यापक, उपयोजित यंत्रशास्त्र (अनु.क्र.२) यांची अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर येथे बदलीने पदस्थापना करण्यात आली होती. तथापि, त्यांनी व अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथील अन्य काही अध्यापकांनी सदर बदली आदेशास मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे व तदनंतर डॉ. बिराजदार वगळून अन्य अध्यापकांनी मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हानित केले होते. सदर न्यायिक प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०७.२०१९ रोजी अंतिम आदेश पारित केले आहेत. डॉ. बिराजदार हे बदली केलेल्या संस्थेत अद्यापपर्यंत रूजू झालेले नाहीत. तथापि, संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी दि. २५.०६.२०१९ च्या कार्यालयीन आदेशानुसार त्यांना बदली झालेल्या संस्थेत रूजू होण्यासाठी कार्यमुक्त केले आहे.

२. आता, प्रशासकीय कारणास्तव व सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने, डॉ. बिराजदार यांच्या संदर्भाधीन दि. ३०.०५.२०१८ च्या बदली आदेशास, पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे व त्यांची पदस्थापना अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे प्राध्यापक, उपयोजित यंत्रशास्त्र या पदावर करण्यात येत आहे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१९१७१०४७०३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sudhir Jaya Shetty

Digitally signed by Sudhir Jaya Shetty
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, serialNumber=e9d37d499a521b728aeb3dc8ec38b759420308b9fd7816002b4af0ffbf1111d7, cn=Sudhir Jaya Shetty
Date: 2019.08.19 17:52:34 +05'30'

(सुधीर ज. शेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. प्र. सह संचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

५. संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे- त्यांना सूचित करण्यात येते की, डॉ. बी.जी. बिराजदार, प्राध्यापक, उपयोजित यंत्रशास्त्र यांना अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे विनाविलंब रूजू करून घ्यावे व त्यांचा रूजू अहवाल संचालक, तंत्र शिक्षण यांचेमार्फत शासनास सादर करावा.
६. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई.
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
९. संबंधित अध्यापक (संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेमार्फत)
१०. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती/(तांशि-१).